७०८५

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे

विषय

दा. क्र. ७०८५

IRBK-0107085

IRBK-0107085

नवप्रौढ साक्षरांसाठीं ठेवलेल्या पुस्तकांच्या स्पर्धेत भारत सरकारतर्फे
रु. ५०० पारितोषिक मिळालेलें पुस्तक

# आपला देश - आपलं वागणं

लेखक :

मधुसूदन पांडुरंग भावे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र.

IRBK-0107085

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक:
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. ( टिळक ),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति १९५९

सर्व हक्क स्वाधीन

# अनुक्रमणिका

१. बेशिस्तपणा - - १
२. सहकार्य - - ८
३. अस्पृश्यता - - १२
४. कुटुंब-नियोजन - - २२
५. आपला ध्वज-घटना व राष्ट्रगीत २९

☆

# १ : बेशिस्तपणा

“ रामराम मास्तर ! ”

“ राम राम कोंडिबादादा ! ”

“ मास्तर, तुमचीच वाट बघत होतों बघा आम्ही ! ”

“ कां हो, माझ्या येण्याची एव्हढी उत्सुकता ? कांहीं विशेष आनंदाची बातमी आहे कीं काय ? ”

“ तसं न्हवं मास्तर ! तुमी आमच्या चाळींत आल्यापासनं फार फायदा झालाय बघा आमचा. येक तर अंगुठ्याशिवाय लिवणं वाचणं आमच्या ‘ बा ’ लाबी ठावं नव्हतं, पन् तुमी आलांत न् अंधाराच्या जागीं उजेड पडलाय बघा ! आपुलकीनं ‘ग’ ‘म’ ‘भ’ ‘न’ लिवायला अन् वाचायला शिकवूं लागलात, शिवाय रोजच्या पेपरामधील बातमी सांगुनशान त्या ओघानं थोडं थोडं ग्यान पण देताय न्हवं का आमाला ? ”

“ कोंडिबादादा ! अहो, मी कसलं ज्ञान देणार तुम्हांला ? पण समर्थ रामदासस्वामींनीं म्हटलं आहे ना ? “ जें जें आपणासी ठावें। तें तें इतरांसी शिकवावें। शहाणे करूनी सोडावे। सकल जन। ” त्याप्रमाणें जें काय थोडंसं मला माहीत आहे तेंच तुम्हांला सांगत असतों. तेव्हढंच माझ्या मनाला पण जरा बरं वाटतं ! ”

“ बरं, त्ये राहूं द्या मास्तर ! अगुदर आजचा पेपर काय म्हनतुया त्यें सांगा बघूं ! ”

“ कोंडिबादादा, बातमी अशी आहे कीं– आपल्या देशांत दर तेरा मिनिटांनीं सांखळी ओढून गाडी थांबविण्याचे प्रकार होत असतात. गेल्या सबंध वर्षांत एकंदर सुमारें तीस हजार वेळां सांखळी ओढण्याचे प्रकार घडले. ”



“ वा ! आजची बातमी लई गमतीची हाय कीं मास्तर ! ”

“ गमतीची तर खरीच. पण अशा या वागण्याला काय म्हणायचं ? ”

“ येडेपना, दुसरं काय ? ” कोंडिबा म्हणाला.

“ कोंडिबादादा, नुसता वेडेपणा म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आपल्या लोकांत शिस्तीचा गुण फारच कमी आहे. कांहीं महत्त्वाच्या कामाखेरीज अथवा आणीबाणीच्या प्रसंगाखेरीज सांखळी ओढूं नये असा नियम असतांना देखील लोक मनाला वाटेल तेव्हां सांखळी ओढून गाडी थांबवितात. त्यामुळें फार तर त्यांचें काम साधतें पण त्यामुळें गाडींतून प्रवास करणाऱ्या हजारों प्रवाशांची मात्र गैरसोय होते. ”

“ मास्तर ! ह्यें बरीक अगदीं खरं. अवो, कालचीच गोष्ट. म्यां साडेनवाच्या लोकलनं कामाला जात व्हतों. गाडी इक्रोलीच्या थोडी पुढें गेली असल बघा, तोंच एकदम विरेक लागलं अन् गाडी थांबली. काय झालं म्हनून बघतोया तो कांहीं लोकांनीं सांखळी ओढून गाडी थांबवली व्हती अन् त्ये लोक शेतामंदीं उतरून कवाच पसार झालेया. मंग गार्ड उतरला, त्येनं सांखळी बराबर केलीया. पन एव्हढ्या घोटाळ्यामंदी वीस मिनिटें निघून गेलीं अन् कधीं न्हवं त्यो कामावर पहिला लेट झालाया ! ” कोंडिबानें सांगितलं.

“कोंडिबादादा, असा बेशिस्तपणा आपल्याला रोजच अनुभवाला येतो. रेल्वेचे अधिकारी रोज लाऊडस्पीकरमधून ओरडून सांगत असतात कीं पहिल्यांदा उतारूंना उतरूं द्या व मगच आपण गाडींत चढा, त्यायोगें कुणालाच त्रास न होऊन सर्वांची सोय होईल. पण गाडी स्टेशनामधें आल्यावर आपणाला काय दृश्य दिसतें ?”



“संमदा गडबड नि गोंधळ !” जयरामदादा उत्तरला.

“अहो, माझा तर एक मित्र नेहमीं गंमतीनं म्हणत असतो कीं गाडी स्टेशनांत यायचा अवकाश, आपल्याला रामरावणाचं युद्ध अगदीं फुकटांत पाह्यला मिळतं !” मास्तर म्हणाले.

“युद्धच न्हवं तर काय मास्तर? येकदां का मानसं चढायला लागलीं कीं त्येंना बाईमानूस का प्वार काय बी दिसत नाय ! एखाद्या रानडुकरावानी मुसांडी मारत्यात !” जयराम बोलला.

“हा सारा बेशिस्तपणाचा परिणाम !” मास्तर म्हणाले.

“कोंडिबादादा, आपल्या मुंबईत रोज कुठें ना कुठें सभा होतच असतात. पण एक सभा शिस्तींत होईल तर शपथ !”

“मास्तर, संमद्या सभामंदी असाच गोंधळ असत्यो कीं काय !” कोंडिबानं विचारलं.

“अहो, गोंधळ म्हणत नाहीं मी ! पण शिस्त नसते हें मात्र खरं. सभा असते पांच वाजतां पण लोक यायलाच सुरुवात होते साडेपांचला. मग अध्यक्ष येतात सहाला. आणि सात वाजतां संपायची सभा आठ वाजतां संपते. आणि आपण मात्र मोठ्या ऐटीनं म्हणत असतों, अहो, हा इंडियन टाइम आहे !”

" मास्तर, सभा म्हटली कीं तिथं उशीर हा व्होयाचाच ! संमद्या देशामंदी असंच असंल न्हवं का ? कोंडिबानं विचारलं.

" कोंडिबादादा, सभा म्हटली म्हणजे उशीर व्हायचाच हें म्हणणें बरोबर नाहीं. आपणच शिस्तींत वागलं नाहीं म्हणजे असं घडतं. सगळा दोष आपल्या वागण्याचा आहे. कोणतेंहि काम वेळेवर करावयाचेंच नाहीं अशी आपल्याला संवयच जडली आहे. दुसऱ्या राष्ट्रांत मात्र असं कांहीं नाहीं हं ! तिथें वेळ म्हणजे वेळ आणि शिस्त म्हणजे शिस्त ! "

" पन् ही सुधारणा व्होयाची कशी ? जो तो आपल्या मनापरमानं वागनार त्येला कोण काय करणार ? "

" कोंडिबादादा, सगळं कांहीं शिस्तीनं व्हायला हवं हें तर तुम्हांला पटतं ना ? काय जयरामदादा, तुम्हांला पण पटतंय् ना ? "

" व्हय् व्हय् पटतंय् तर ! " दोघांनीं एकदम रुकार दिला.

" मग तुम्हीच करा बघूं सुरुवात शिस्तीनं वागायला. "

" पन् मास्तर, आमी एक दोन मानसांनीं शिस्तींत वागुन-शान् संमदं लोक कसं सुधारणार ? " जयरामनें विचारलें.

" जयरामदादा, इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, " आपण सुधारलें कीं जग सुधारतें ! " मास्तर म्हणाले.

" ह्येंचा अर्थ काय मास्तर ? " कोंडिबानं विचारलं.

" असं पाहा कोंडिबा, प्रत्येकानें मनाशीं ठरविलं कीं आपण शिस्तीनं वागायचं, इतरांकडे बघायचं नाहीं तर अखेरीस काय होईल, सगळ्यांनाच शिस्तीचा गुण जडेल, नाहीं का ? तेव्हां वेळ न घालवितां आपणच मनाशीं निश्चय करायचा कीं कांहीं झालं तरी आपण शिस्तीनं वागायचंच ! "

" मास्तर, आमचा निश्चय ठरला ! आमी सभेला येळेवर जानार, कामावर येळेवर जानार ! "


" वा कोंडिबा, तुमच्या निश्चयानं मला तर खूप आनंद झाला. तुम्ही पण शिस्तीनं वागा आणि दुसऱ्या लोकांना पण त्याचें महत्त्व सांगत चला. "


" मास्तर, शिस्तीनं वागायचं म्हंजे आनखीन काय काय कराया होवं ! " कोंडिबानं विचारलं.

" कोंडिबा, शिस्तीचे फायदे फार मोठे आहेत. एक शिस्तीचा गुण अंगीं असेल तर कितीतरी गोष्टी करायला सोप्या जातात. साधें खेळाचेंच उदाहरण आपण घेऊं ! समजा, हुतुतूचा खेळ चालला आहे. पण नियमाप्रमाणें न खेळतां कडेच्या गड्यानें मधेंच येऊन गडी धरायचा प्रयत्न केला अगर एका वेळेला एकानें हुतुतू करीत जावयाच्या ऐवजीं दोघे एकदम जाऊं लागले तर काय होईल ? "

" खेळाचा संमदा इचका होईल मास्तर ! "— जयराम-दादा.

"बरोबर ! सिनेमांचीं तिकिटें काढायचीं आहेत आपल्याला, पण रांगेनं उभे न राहतां सगळ्यांनींच खिडकीजवळ एकदम घोळका केला तर काय होईल कोंडिबा ? " मास्तरांनीं विचारलें.





“ कुनालाच तिकिटं आधीं गवसणार नाय. अन् परसंगीं हानाहानी अन् लट्ठालट्ठी वी होईल ! मंग जो गडी ताकदवान असतुया त्येला मिळतात धा धा तिकटं अन् जो असल कमकुवत त्येला बसतुया गचांडी ! ” कोंडिबा उत्तरला.


“ होय ना ? म्हणजे इथेंहि शिस्त असेल तरच सर्वांना गडबड गोंधळ न होतां तिकिटं मिळतील. आतां साधे रस्त्यानें चालायचेंच पाहा ना ! वाटेल तिथें, डावी–उजवीकडे न बघतां, रस्ता ओलांडल्यामुळें आपल्या मुंबईत नेहमीं कितीतरी अपघात होतात नाहीं का ? रस्त्यानें चालायचें तरी शिस्त हवी. माणसानें रस्त्याच्या डाव्या बाजूनेंच चालावें, फूटपाथ असेल तर त्यावरून चालावें, असे नियम आहेत ना आपल्या मुंबईत, जयरामदादा ? ”

“ अवो, परवांच आमच्या कारखान्यांतला येक मानूस असाच मोटारखालीं सापडूनशान् जागच्या जागीं खलास झाला, मास्तर ! ” जयरामदादानं सांगितलं.

“ कुठें कांहीं उत्सव चाललेला असला म्हणजे आपल्याकडच्या देवळांतून सारखा घंटांचा ठणठणाट आणि लोकांचा कलकलाट चालू असतो. देवळांत चालू असलेलं कीर्तन किती लोकांना ऐकूं जात असेल बरं ? उत्सव संपल्यावर प्रसाद घ्यायचीच गोष्ट घ्या.



सगळे लोक शिस्तीनें प्रसाद घेतील तर किती सोयीचें होईल? पण आपण काय पाहतों? प्रसाद वाटणाऱ्याच्या पुढें एकदम असंख्य हात येतील. पण अशी गडबड नि गोंधळ परदेशांतल्या देवळांतून नाहीं हं दिसायचा! तिथें सभा असो कीं चर्चमध्यें प्रार्थना असो, सगळं कांहीं



शिस्तींत आणि शांततेनें चालूं असतं."

"परसादाची गोष्टच सोडा पन् परसंगीं धक्क्याबुक्क्यांचा परसाद मातुर मिळतुया कवा कवा!" कोंडिबा म्हणाला.

"तेव्हां कोंडिबादादा, आजच्या बातमीवरून आपण काय शिकायला हवें असेल तर तें हें कीं आपल्या वागण्यांत शिस्त हवी. ज्या देशांत शिस्तीचा अभाव असतो, त्या देशाला वर यायला वेळच लागायचा. सभा, समारंभ वा कीर्तन असो, त्या कार्यक्रमांस वेळेवर जाणें, कार्यक्रमांत अगर सभेंत गडबड न करणें, राष्ट्रगीत संपल्याशिवाय सभा न सोडणें, राष्ट्रगीताच्या वेळीं शांतपणानें उभे राहणें, अशासारख्या सगळ्या शिस्तीच्या गोष्टी आपण आपल्या अंगीं बाणवून घेतल्या पाहिजेत! चला आतां, आमच्या शाळेची पण वेळ झाली!"— मास्तर म्हणाले.

"व्हय मास्तर! शाळेंत बी येळेवरच जायास हवं न्हवं का, नायतर शिस्तीची बेशिस्त व्हायची! बरं हाय मास्तर येतुंया!"

"राम राम!"

"राम राम!"

★ ★ ★

"राम राम मास्तर!"

"राम राम कोंडिबादादा! राम, राम, जयरामदादा!"

"वा, आज तर तुम्ही ठरलेल्या वेळेपेक्षां पंधरा मिनिटें आधींच आलांत कीं!"

"अवो, कालच तुमी आमाला शिस्त हवी म्हून सांगितलंत अन् तरीसुद्धां आमी येळेवर आलों नाय तर तुमीच म्हननार बघा येवढं रामायन सांगितलं तरी ह्येंची संवय काय जात नाय." कोंडिबानं हंसत उत्तर दिलें.

"वा, कोंडिबा, शिस्तीचं महत्त्व खरोखरीच पटलंय तर तुम्हांला. बरं, आपण आतां आजची बातमी पाहूं या!"

"आज कोनच्या बातमीवर चार शब्द सांगनार हाय मास्तर?" जयरामनं विचारलं. "सकाळीं उठलं कीं असं होतंय बघा कीं कवां एकदां आठ वाजत्यात अन् मास्तराच्या खोलीवर जाऊनशान घटका अर्धा घटका ग्यानाचं चार शब्द ऐकतुंया."

"जयरामदादा, अहो, मी हें तुम्हांला सांगतोय हें कांहीं खरं ज्ञान नव्हे, या व्यवहारांतल्या साध्या गोष्टी आहेत. पण गंमत अशी झाली आहे कीं आपल्या देशांत शिकलेल्या लोकांचें प्रमाण फारच कमी आहे. आणि मग तुमच्यासारख्या कमी शिकलेल्या लोकांना आमच्यासारखे जरा जास्त शिकलेले लोक कांहीं सांगूं लागले, म्हणजे तुम्ही त्याला म्हणणार ज्ञान. आपल्याकडे एक म्हण आहे ना, "वासरांत लंगडी गाय शहाणी" तसंच आहे बघा!"

"बरं तें जाऊं द्या मास्तर! आजची बातमी तर सांगा!" कोंडिबा म्हणाला.

“ आजची बातमी अशी आहे—

“ आपल्या देशांत तांदुळाचा खूपच तुटवडा आहे. तेव्हां लोकांनीं तांदुळाऐवजीं गहूं जास्त खावा अशी इच्छा भारत सरकारनें प्रदर्शित केली आहे. या इच्छेनुसार आचार्य विनोबा भावे यांनीं यापुढें आपल्या आहारांतील तांदुळाचा भाग अजिबात कमी करून त्याऐवजीं ते गहूंच जास्त प्रमाणांत खाणार आहेत!”



“ मास्तर, त्ये इनोबा भावे म्हंजी त्ये भूदानवालं न्हवं का?” जयरामनें प्रश्न केला.

“ होय, अगदीं बरोबर. त्यांची माहिती मागें एकदां मी तुम्हांला सांगितली होती नाहीं का?”

“ अवो, त्यो मानूस म्हंजी दुसरं गांधीच! तुमा आमास्नी काय तसं जमनार हाय व्हय? सर्वोदय का काय त्यें त्येंचच हाय न्हवं का?”

“ जयरामदादा, अगदीं बरोबर लक्षांत ठेवलं आहांत कीं, चांगली प्रगति आहे हं तुमची. सर्वोदय करायचा म्हणजे काय? तर सर्वांची प्रगति करायची. पण प्रगति करायची म्हणजे मुख्य गोष्ट हवी असेल तर ती म्हणजे सर्वांचें सहकार्य.” मास्तर म्हणाले.

“ व्हय त्यें तर हवंच” कोंडिबा.

“ आणि आजच्या बातमीवरून हेंच आपल्याला शिकायचें आहे. तांदुळाचा भरमसाट वापर केला आणि सरकारनें

सांगितल्याप्रमाणें वागून जर आपण त्या कामांत सहकार्य दिलें नाहीं तर परिणाम काय होईल! तांदूळ अजिबात खलास होईल आणि जे काय चार दाणे मिळायचे ते पण बंद होऊन सर्वांचेच हाल व्हायचे; तेव्हां आलेल्या संकटावर मात करावयाची असेल तर आपण सर्वांनीं सहकार्य करायला हवें. आणि आज मी तुम्हांला हेंच मुख्यतः सांगणार आहे, कीं एकमेकांचें सहकार्य असेल तरच आपण सारे सुखी होऊं!"

"मास्तर, पन् समद्यांस्नी कुठं व्हो येवढं गवसतंय?" कोंडिबा.

"अहो, आज त्यांना नाहीं उमजणार, पण म्हणून तुमच्या आमच्या सारख्यानं त्यासाठीं प्रयत्न नको का करायला? आपण त्यांना सहकार्याचं महत्त्व पटवून द्यायला हवं."

"पन् त्यें आमी त्येंना कसं काय शिकवायचं? आमास्नी काय तुमच्यावानी फाडफाड बोलतां येतंय थोडंच?" कोंडिबा.


"कोंडिबादादा, रोजच्या वागण्यांतल्या साध्या साध्या गोष्टींवरून आपण दुसऱ्यांना सहकार्याचें महत्त्व पटवून देऊं शकूं. मात्र आपलें आचरणहि तसंच हवं बरं का! नाहींतर म्हणतात ना, "लोका सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडे पाषाण" तसं व्हायचं!"

"मास्तर, सहकार्य हवं ह्यें अमास्नी समजलं पन् यासंबंधीं जास्त सांगाल तर त्येवढंच चारचौघामंदी सांगाया बी जरा सोपं हुईल." कोंडिबा.

"हात्तिच्या, एव्हढंच ना? मी सांगतों यावर आणखीन् थोडंसं. असं पाहा, कोंडिबादादा, आपल्या हाताला बोटें किती आहेत सांगा पाहूं?"

"अवो पांच." कोंडिबा उत्तरला.

" पण तीं पांच बोटें सारखीं आहेत कां ? " मास्तरांनीं विचारलें.



" येक बी येकासारखं नाय हाय ! " जयरामदादानें उत्तर दिलें.

" होय ना, पण ह्या पांचाहि बोटांच्या सहकार्यामुळें आपल्याला किती बरं फायदा होतोय. लिहायचें असो, जेवायचें असो, अगर कांहीं जड वस्तु उचलायची असो, त्या पांच बोटांच्या एकमेकांच्या सहकार्यामुळें हीं सर्व कामें आपण अतिशय पटकन् करूं शकतों नाहीं का ? "

" व्हय मास्तर " कोंडिबा.

" समजा, उद्यां अंगठा तुटला तर काय होईल ? "

" संमदी कामं करायला तरास व्हईल मास्तर. " कोंडिबा म्हणाला.

" हेंच उदाहरण लक्षांत ठेवा नेहमीं, कोंडिबादादा. जशीं हाताचीं बोटें एकासारखीं एक नाहींत, प्रत्येकाचें वैशिष्ट्य वेगवेगळें आहे, तरीसुद्धां एकमेकांच्या सहकार्यानें त्यांचें काम चालूं असतें.



तसंच आपलें व्हायला हवं. आपल्यांताहि श्रीमंत आहेत, गरीब आहेत, बुद्धिमान् आहेत, तसेच अशिक्षिताहि आहेत. सगळ्या प्रकारचे लोक आहेत. असं असूनहि जर आपण सारे सह-कार्यानें वागूं तर श्रीकृष्णानें नुसत्या करंगळीनें जसा पर्वत उचलला, तसा भला मोठा

संकटाचा डोंगर आपण या सहकार्याच्या बळावर पार इकडचा तिकडे उचलून फेकून देऊं ! ”

“ मास्तर, तुमचं म्हननं बरोबर हाय ! ” कोंडिबा.

“ कोंडिबादादा, आपले साधुसंतसुद्धां हेंच म्हणतात कीं, ‘ एकमेकां साहाय्य करूं, अवघे धरूं सुपंथ. ’ होय कीं नाहीं ? ”

“ व्हय, व्हय, मास्तर ! ”

“ कोंडिबादादा, तुमच्या घराचीच गोष्ट घ्या ना. तुम्ही घरांतले कर्ते पुरुष आहांत ! समजा, तुम्ही मिळवून आणलंत आणि तुमच्या बायकांमुलांनीं तुमच्या म्हणण्याप्रमाणें न वागून जर पैशाची उधळपट्टी केली, मन मानेल त्याप्रमाणें खर्च केला, तर काय होईल ? ”

“ लौकरच आमचं पार बारा वाजतील मास्तर ! ”— कोंडिबा.

“ म्हणूनच म्हणतों कोंडिबादादा, जी गोष्ट घराची तीच देशाची. या देशांत राहणाऱ्या सर्व लोकांचा हा देश हें एक घर आहे. येथील सरकार हें त्या घरांतील कर्ता पुरुष होय आणि आपण सारे त्या घरांतील इतर माणसें आहोंत. आपणच जर त्या कर्त्या पुरुषाला ( म्हणजेच सरकारला ) त्याच्या कामांत सहकार्य दिलें नाहीं तर देशाच्या सगळ्या योजना फुकट जातील आणि शेवटीं परिणाम काय होईल ? आपली परिस्थिति आपणच बिघडवून घेऊं. तेव्हां कुटुंबांत जसं साऱ्यांनीं एकमेकांवर प्रेम करून सहकार्यानं राहिलं तर सुख मिळतं, तसंच देशांतील सर्व लोकांनीं एकमेकांना सहकार्याचा हात दिला तर साऱ्यांनाच सुखाचे दिवस लौकर येतील, यांत कसली शंका ? आपल्या देशांत श्रमदानानें म्हणजेच सहकार्यानें कामें करून किती तरी रस्ते, शाळेच्या इमारती गांवोगांवीं उभारलेल्या आहेत. ह्याच गोष्टी कंत्राटानं

दिल्या असत्या तर पैशापरी पैसा जास्त खर्च होऊन वेळहि खूप लागला असता. पण हेंच काम सहकार्यानं केल्यावर पैशांची बचत झाली, गांवाची सोय झाली आणि कांहींतरी चांगलें काम केल्या-मुळें मनालाहि हुशारी आली. तेव्हां, कोंडिबादादा, देशाच्या भलेपणासाठीं विध्वंसक वृत्ति नको, बेशिस्त नको, तर सहकार्याची भावना मात्र वाढायला हवी आहे!"

"वा, वा, मास्तर, लई ब्येस. आमी बी आतां यापुढें हेंच करनार! सहकार्य–सहकार्य–सहकार्य!"

"चला, आपली वेळ झाली. यापुढची बैठक—"

"उद्यां सकाळीं न्हवं का?" बराय्.

"राम राम मास्तर!"

"राम राम मंडळी!"

★ ★ ★

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम..........
दिनांक..........

## ३ : अस्पृश्यता

" कोंडिबादादा, आजची बातमी फारच भयंकर आहे ! "

" म्हंजे काय ? कुठं आगबीग लागली कीं काय ? का कुठं भूकंप होऊनशान् मानसं विनसं मेल्याती मास्तर ? " कोंडिबानं विचारलं.

" कोंडिबादादा, आजची बातमी म्हणजे एक अतिशय दुर्दैवी घटना आहे. माणुसकीला काळीमा लावणारी आहे. "

" असं घडलं तरी काय मास्तर ? " कोंडिबानं उत्सुकतेनं विचारलं.

" अहो, उस्मानाबादजवळील एका खेडेगांवची गोष्ट आहे ही ! "

" काय घडलंय् तिथं ? " कोंडिबा.

" एका लहान मुलानें मिरच्याचीं कांहीं झाडें तोडल्यावरून हें सारं प्रकरण उद्भवलं आणि अखेर असल्या भीषण दुष्कृत्यांत त्याचा शेवट झाला. "

" मास्तर, संमदं सांगा कीं पटकन्. आमालाबी उत्सुकता लागलीय न्हवं का ? " जयराम म्हणाला.

" अहो, एका मुलानें शेतांतील कांहीं झाडें तोडलीं. त्यावरून तंटा झाला मोठ्यांचा. मग यांतूनच दोन जमातींत मोठें भांडण जुंपलें. आणि शेवटीं स्पृश्य जमातीच्या लोकांनीं खालच्या जमातीच्या म्हणजे मातंग जातीच्या लोकांच्या घरावर हल्ला केला. त्यांच्या घरांतल्या बाईनें या स्पृश्य लोकांना कळवळून विनंती केली कीं, कृपा करून कोणाला मारूं नका. पण स्पृश्य जमातीच्या या पन्नाससाठ लोकांनीं तिचें कांहीं ऐकलें नाहीं. ते घराच्या कौलारावर चढले आणि आंत शिरून त्यांनीं आंतल्या

लोकांना बेदम मारलें. अखेर यांत तीन माणसें त्यांनीं ठार केलीं. इतरांना जखमी केलें. झोपडीला आग लावून दिली. अशी आहे बातमी आजची."



"अररर, मास्तर, झालं हें काय चांगलं झालं नाय !"

"कोंडिवादादा, ज्या दिवशीं आपल्या देशांतली ही अस्पृश्यता नाहींशी होईल तो सुदिन म्हणायचा. या सर्व अस्पृश्यतेला तुम्ही आम्ही कारणीभूत आहोंत."

"हें हो कसं मास्तर?" कोंडिवानं विचारलं.

"अस्पृश्यता कोण पाळतो? आपणच ना? अरे शिवूं नको, पाणी घेऊं नको, शेजारीं बसूं नको, असं कोण कोणाला सांगत असतो? आपणच ना?"

"व्हय मास्तर!"

"आपल्या धर्माची महती खरोखरी केव्हढी मोठी आहे. पण धर्म मोठा असला तरी माणसं मात्र मनानं फार छोटीं झालीं आहेत. साध्या माणुसकीच्या धर्मालासुद्धां आपण विसरलों."


"पन् मास्तर, हें बापजाद्यापासनं चालत आलंय् न्हवं का? अन् आतां येकदम महारास्नी घरामंदी घ्यायचं म्हंजे मनाला जरा वंगाळ वाटतंय! शिवाय आजुबाजूचीं मानसं येवढालं डोळं करत्यात, त्येंबी ध्यानांत घ्याया हवं, न्हांई का?" जयरामदादानें उत्तर दिलें.

"जयरामदादा, म्हणजे केवळ लोक रागावतील म्हणून तुम्ही खरेंसुद्धां मानणार नाहीं असेंच ना?" मास्तरांनीं विचारलें.

“ कवां कवां असं व्हतं खरं मास्तर ! ” कोंडिबा.

“ कोंडिबादादा, अशा भीतीनं जर आपण या अस्पृश्य लोकांना नेहमींच अशी वागणूक दिली तर पुढें मागें आपल्याला मानानं जगणंसुद्धां कठीण होईल. या जगांत सगळीकडे आपली छी, थू होईल. कोंडिबादादा, एक गोष्ट सांगतों ती लक्षांत ठेवा—

“ एकदां काय झालं, उंदरांनीं एक सभा भरवली. त्या सभेंत मांजर नेहमीं आपल्याला मारून खातें तेव्हां त्यासाठीं काय उपाय करावे याबद्दल विचार सुरू झाला. कोणी कांहीं, कोणी कांहीं युक्त्या



सुचविल्या. अखेरीस सर्वानुमतें ठरलें कीं आपण मांजराच्या गळ्यांत घंटा बांधायची. त्यामुळें तें जेव्हां जेव्हां येईल तेव्हां तेव्हां त्याच्या गळ्यांतील घंटा वाजेल व त्यामुळें आपल्याला बिळांत लपून राहणें शक्य होईल. पण प्रत्यक्ष घंटा बांधायला कोणीच तयार होईना. ज्याला त्याला तें मांजर आपल्याला खाऊन टाकील अशी भीति वाटूं लागली. त्यामुळें कोणीच घंटा बांधूं शकलें नाहीं आणि मांजराचा उद्योग मात्र कायम चालूच राहिला. आपलंसुद्धां असंच आहे. ”

म्हंजे कसं त्यें बरोबर लक्षांत आलं नाहीं मास्तर ”— कोंडिबा.

“ अहो, मांजराच्या गळ्यांत घंटा बांधली पाहिजे याबद्दल सर्वांचें एकमत होतें, त्याचप्रमाणें अस्पृश्यता ही गेली पाहिजे याबद्दल आपणां सर्वांचें एकमत आहे. पण पुढाकार घेऊन घंटा

बांधायला जसें कोणी धजेना, कारण घंटा बांधायला जातां मरण येई. त्याप्रमाणें अस्पृश्यता नष्ट करायला जावं तर इतर लोक नावं ठेवतील या भीतीनें आपण यांत पुढाकार घेत नाहीं. पण कोंडिबा, अशा वागण्यानं कांहीं हा प्रश्न सुटणार नाहीं. जें सत्य आपल्याला पटलं आहे तें आपण तावडतोब अमलांत आणलें पाहिजे. आणि हाच खरा धर्म. महात्मा गांधी तर म्हणत, "सत्य हाच परमेश्वर." सत्यासाठीं मरणसुद्धां आनंदानं पत्करलं पाहिजे. पण कोंडिबा, अगदीं एकदमच इतकं केलं नाहीं तरी चालेल, पण नित्यनेमानें, योग्य प्रकारें याचा प्रचार करून अस्पृश्यता कशी वाईट आहे हें लोकांना चांगल्या रीतीनें समजावून, त्यांच्या मनावरील रूढीचा पगडा कमी करायला हवा आणि एकदां का मनाची तयारी झाली कीं मग पुढचं काम सोपं होतं."

"पन् ह्यं परचाराचं काम अमास्नी कसं काय जमनार? आन् आमी लोकास्नी सांगावं तरी काय? लोक म्हनत्यात असं वंगाळ वागल्यानं पाप लागतुंया!" कोंडिबा.

"कोंडिबादादा, पाप आणि पुण्य म्हणजे तरी काय? या दोन शब्दांचे अर्थ अगदीं सोपे आहेत. आपल्या वागण्यापासून लोकांना उपयोग होणं—सुख होणं—आनंद होणं म्हणजेच पुण्य आणि याच्या उलट जें होतें तें पाप. आतां तुम्हीच सांगा, आपल्याच-सारखा नाकाडोळ्याचा, आपल्याचप्रमाणें राम कृष्ण यांना भजणारा, आपल्याचप्रमाणें सर्व भावना असलेल्या, आपल्याच धर्माच्या माणसाला आपण विटाळ होतो म्हणून दूर ठेवणें हें पापच नाहीं का? आपण सारीं एकाच धर्माचीं माणसं म्हणजे भाऊ भाऊ. मग, भावाचा भावाला विटाळ होतो का? आहे का असं कुठल्या शास्त्रांत? कोंडिबादादा, समजा तुम्ही चार भावंडं आहांत, त्या भावांपैकीं सगळ्यांत धाकटा भाऊ अगदीं मठ्ठ आहे, त्याला

ना कांहीं काम येत, ना कांहीं मिळविण्याची अक्कल. मग त्या भावाला कसे वागवाल तुम्ही ?"


"आमी तिघं येक होऊनशान् त्येला सांभाळून घेऊं." कोंडिबा उत्तरला.

"होय ना, मग तसंच आहे इथं. महार घाण काम करीत असतील. साहजिकच त्यांच्या राहणींत



स्वच्छता कमी असेल, पण म्हणून त्यांना सदैव दूर लोटणं चांगलं नाहीं. महात्मा गांधी तर महारांना हरिजन म्हणत. कां, ठाऊक आहे ? हे लोक जे काम असतं तें खरोखरी पवित्रच काम करतात. तुमची आमची सगळी घाण उपसून स्वच्छता निर्माण करण्याचें केव्हढें मोठें काम करीत असतात हे लोक. स्वतःचें जीवन घाणींत खर्च करून इतरांचें आरोग्य निर्मळ ठेवण्यासाठीं सदैव खपणारे हे लोक हरीचेच भक्त नव्हेत तर कोण ? पण अशा लोकांना आम्ही आज किती बरें लांछनास्पद वागणूक देत आहों ?"

"मास्तर, तुमचं म्हननं येकदम बराबर हाय !"— जयरामदादा.



"शिवाय, असं पाहा जयरामदादा, तुमचा डावा हातसुद्धां घाण धुण्याचेंच काम करतो ना ? मग तुम्ही तुमच्या डाव्या हाताचा काय विटाळ मानतां ?"

"नाय बा, तसं कसं होईल ?" कोंडिबा म्हणाला.

" उलट उजव्या हाताप्रमाणेंच डाव्या हातावरहि तितकेंच प्रेम करतां ना ? मग आपण सारीं माणसं एकाच शरीरधर्माचीं असतांना हा महार, हा शूद्र असें म्हणून प्रत्येकाला वेगळें ठेवणें बरोबर आहे का ? "

" या बाबतींत कोंडिबादादा, आतां आपणच पुढाकार घ्यायला हवा. आतां, परिस्थिति बदलली आहे. त्याप्रमाणें धर्मांतले आचारविचार पण बदलायला हवेत. धर्माचा खरा अर्थ काय आहे ठाऊक आहे का कोंडिबादादा तुम्हांला ? "

" आमास्नी कसं सांगतां येणार त्यें ! " कोंडिबा.

" अहो, ज्या धर्मानें सर्वांची चांगल्या रीतीनें उन्नति होते तो धर्म. धर्म हा कांहीं देवाब्राह्मणांनीं बनविलेला नाहीं, हा त्या त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें माणसांनींच बनविलेला आहे. आतां जग सुधारत आहे. मोटारगाड्या, विमानें, रेडिओ, ॲटमबाँब यापुढेंहि जाऊन मनुष्यानें आतां कृत्रिम चंद्रसुद्धां निर्माण केला आहे. "

" व्हय, मागं त्या रशियनानं येक चंद्र सोडला व्हता न्हवं का ? " कोंडिबा.

" बरोबर, तेव्हां कोंडिबा, आतां इतका काळ बदलल्यावर धर्माचा आचारहि तोच तो ठेवणें योग्य होणार नाहीं. पूर्वी सोयीसाठीं चार वर्ण केले होते. ब्राह्मणवर्गानें खूप विद्या संपादन करून राज्यांतली व्यवस्था बघावी, क्षत्रियांनीं देशाच्या संरक्षणा-







साठीं लढाईवर जावें, वैश्यांनीं व्यापार बघावा, महारांनीं स्वच्छता ठेवण्याचें काम बघावें. असे चार वर्ग सोयीसाठींच केले होते. पण आतां काय झालें आहे, त्यांतला मुख्य उद्देश बाजूला झाला आणि खालीं उरलेल्या चौथ्यावरून भांडणें मात्र वाढलीं आणि तीं भांडणें इतक्या विकोपाला गेलीं आहेत कीं सर्व धर्मांचा मुख्य धर्म जो " माणुसकी " तोच आपण विसरूं लागलों आहोंत. कोंडिबादादा नुकतेच हजारों महार हिंदुधर्म सोडून बौद्ध झाल्याचें मागें आपण वाचलें. मला स्वतःला याबद्दल मात्र फार वाईट वाटलं. "

" मास्तर, त्येंनी त्येंची सोय बघितली, दुसरं काय ? " कोंडिबादादा.

" त्याबद्दल नाहीं मला वाईट वाटत. पण आपल्या लोकांना मात्र झाल्या प्रकाराबद्दल कांहींसुद्धां खंत वाटत नाहीं. या लोकांनीं आपला संबंध तोडून जगाला दाखवून दिलें कीं ज्या हिंदुधर्माची महती जगांत गायिली जाते त्याच हिंदुधर्मांत साधी माणूसकीहि आतां औषधालाहि शिल्लक उरली नाहीं. याचा परिणाम खरोखरीच अतिशय वाईट होणार आहे ! "

" ह्यें मातुर खरं हाय मास्तर ! —" कोंडिबा.

७०८५





"याचें सगळें मूळ आपल्या वागण्यांत आहे. आपण भावाला भाऊ म्हणून वागूं देत नाहीं हा आपला दोष आहे. टिळक, आगरकर, फुले, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, महात्मा गांधी, विवेकानंद, विनोबा भावे अशा थोर थोर व्यक्ती ज्या धर्मातून उदयास आल्या त्याच धर्मांतील तुम्हां आम्हां लोकांना अस्पृश्यतेसारखा कलंक पुसून टाकतां येत नाहीं ही गोष्ट खरोखर फारच दुःखदायक आहे."



"कोंडिबादादा, आपली वेळ संपली. पण आजच्या बातमीवर सांगितलेला विचार लक्षांत ठेवा, कीं जोंपर्यंत अस्पृश्यतेचा कलंक आपण चालू ठेवीत आहोंत, तोंपर्यंत धर्माचा खरा अर्थच आपणाला कळत नाहीं. अस्पृश्यता नाहींशी करणें याचाच अर्थ सर्वत्र माणुसकीचा धर्म निर्माण करणें होय!"



"वा, वा, मास्तर, आज तर तुमच्या बोलण्याला लई धार चढली व्हती. इषयच तसा हाय न्हवं का? ह्यें वरीक येकदम खरं कीं अस्पृश्यता जाया हवीच. बराय्, येतों मास्तर!"

"अच्छा, नमस्ते!"

★ ★ ★

" राम राम कोंडिबादादा ! "

" आज तुम्ही एकटेच आलांत, अन् जयरामदादा कुठं गेलेत ? "

" अवो, आज त्येची बायको दवाखान्यांत गेलीय न्हवं का ? "— कोंडिबानें उत्तर दिलें.

" म्हणजे आजारी बिजारी होती कीं काय ? "

" मास्तर, आजारपन कसलं आलंया. अवो, वरसा सवा वरसाला हें आजारपन असतंच त्येंच्याकडं. आज त्येंची बायको बाळंतहून पांचवा पोरगा झालाय् जयरामदादाला ! "

" वा ! आनंदच आहे म्हणायचा ! " मास्तर म्हणाले.


" अवो, कशाचा आनंद आलाय. एक बाळतपन म्हंजी शंभर सव्वासे रुपये लागत्यात या मुंबईत. अन् दुसऱ्या मुलांची पन् काय ना काय रड हायेच. खरं म्हनाल मास्तर, तर जयरामदादा अगदीं इटून गेलाय् या गोष्टीला ! " कोंडिबानं सांगितलं.

" छान ! कोंडिबादादा, आजची बातमी आणि आजचा विषय दोन्ही अगदीं जयरामदादासारख्या हजारों जयरामदादांना उपयोगाचा आहे बघा ! "

" म्हंजी म्यां नाय समजलों काय म्हनताय् त्यें. " कोंडिबा.

" कोंडिबादादा, ऐका आजच्या पेपरामधली बातमीः—

" काल संध्याकाळीं विरारकडून येणाऱ्या लोकलखालीं एका तीस पसतीस वर्षांच्या इसमानें रुळावर आडवे पडून जीव दिला. सदर इसमाचे खिशांत एक चिठ्ठी सांपडली. त्यांत त्यानें



लिहिलं होतं कीं मी माझ्या आईवडिलांचें, बायकोचें व सहा मुलांचें पालनपोषण करण्यास असमर्थ असल्यामुळें स्वखुषीनें जीव देत आहे."

"मास्तर, म्हंजे जयरामदादासारख्यानं गाडीखालीं जाऊन जीव द्यावा कीं काय?" कोंडिबादादानं विचारलं.

"कोंडिबादादा, असं कसं म्हणेन मी! मी काय सांगणार आहे तें ऐकून तर घ्या नीटपणें. त्या माणसानें जीव कां दिला? घरांत माणसं जास्त होतीं म्हणूनच ना?" मास्तरांनीं विचारलें.

"व्हय मास्तर!"— कोंडिबा.

"म्हणजे मिळविणारा मनुष्य एकटा आणि खाणारीं तोंडें दहा. त्यामुळें काय झालं? मिळविणारा मनुष्य गेला वैतागून आणि अखेर कंटाळून त्यानें जीव दिला."

"पन् मंग ह्येला विलाज काय?" कोंडिबानं प्रश्न केला.

"सगळं सांगणार आहे. मात्र नीट ऐकून घ्या. आणि आजपासून त्या गोष्टीचा सगळीकडे प्रचार करा. आतां दुसरी बातमी वाचतों, ती अशी:—

"आजपासून मुंबई राज्यांत कुटुंब-नियोजन सप्ताह पाळण्यांत येणार आहे. मुंबई राज्याचे मुख्य मंत्री त्या सप्ताहाचें उद्घाटन करणार आहेत."

“ मास्तर, आपल्या मुंबईत नेहमींच काय ना काय सप्ताह चालूच असत्यात्. आतां ह्यें कुटुंबनियोजन का काय हाय? काय भानगड हाय ही? ” कोंडिबानं विचारलं.




“ कोंडिबादादा, कुटुंब-नियोजन म्हणजे मर्यादित कुटुंब ठेवणें. म्हणजेच प्रत्येकानं आपली मिळकत पाहून आपल्या घरांतल्या माणसांची संख्या मर्यादित ठेवायची. ” मास्तर म्हणाले.

“ त्यें कसं काय शक्य हाय मास्तर? अन् घरांत जर जास्त मानसं असतील तर त्येस्नी काय करायचं? ” कोंडिबानं विचारलं.

“ त्यांना कांहीं हाकलून नाहीं द्यायचें. पण निदान यापुढें तरी नवीन माणसांची भर त्यांत घालायची नाहीं, म्हणजेच नव्या माणसाला जन्म द्यायचा नाहीं. ”

“ पन् ह्यें कसं शक्य व्हनार? अवो, मुलं म्हंजी देवाची कृपा. त्येला मानूस काय करनार? देवाच्या मर्जीइरुद्ध काय आपल्याला वागतां येनार हाय? ”

“ कोंडिबादादा, एक संतवचन आहे कीं, “ नर करनी करे तो नरका नारायण वन जाय. ” माणूस काय करूं शकणार नाहीं? परमेश्वरानं त्याला बुद्धि दिली आहे. त्याचा त्यानें जर उपयोग केला नाहीं तर माणसाचा जन्म फुकट आहे. कोंडिबादादा, दोन मुलांच्या मध्यें कमींत कमी तीन ते चार वर्षांचें अंतर हवें. त्यासाठीं अलीकडे निघालेल्या साधनांचा वापर केला असतां असें अंतर ठेवणें सहज शक्य होतें. आणि साधारणपणें तीन ते

चार मुलें झालीं म्हणजे मग पुढें शक्यतों घरांत पाळणा न हाललेलाच बरा ! ”

“ पन् हीं साधनं वापरायचीं म्हंजे देवाच्या मर्जी इरुद्ध वागुनशान् पाप करायचं न्हवं का ? ” कोंडिबानं विचारलं.

“ कोंडिबादादा, तुमचं पाप आणि पुण्याचें वेड फारच मोठं दिसतेंय. म्हणे, देवाची कृपा. कोंडिबादादा, देव वर्षाकांठीं नव्या बाळाला जन्म देतो, पण त्याच्या पालनपोपणासाठीं कांहीं पैशांची मोठी पिशवी नाहीं बरोबर पाठवून देत. मग अपुऱ्या पैशांमुळें नाहीं पोरांना पोटभर खायला मिळत, नाहीं अंगावर कपडे मिळत, ना शिक्षण होत. मग अशा तऱ्हेनं पोरांची आबाळ करणें हें पाप का पुण्य ? ”

“ मास्तर, ह्यें बी पटतंय, पन् अशा तऱ्हेनं वागनं आपल्या लोकास्नी नाय जमायचं ! ”

“ कोंडिबादादा, सगळं कांहीं जमेल. पण जुन्या कल्पनांचे आपल्या मनावर जे संस्कार झालेले आहेत ते मात्र नाहींसे करायला हवेत आणि कुटुंबनियोजनाचा सतत प्रचार केला कीं हें हमखास जमूं शकेल. परवांच आपल्या देशाच्या पंतप्रधानांनीं सर्व देशांतील लोकांना सांगितलें कीं देशाच्या भरभराटीसाठीं आतां कुटुंबनियोजनसुद्धां करायला हवं. ”


“ मास्तर, कुटुंबनियोजनाचा देशाला हो काय फायदा ? ” कोंडिबा.

“ कोंडिबादादा, आपल्या देशाची लोकसंख्या दरवर्षीं जवळ जवळ चाळीस लाखांनीं वाढतेय ! ”

“ अबबब ! लई मोठा हाय कीं ह्यो आंकडा ”—कोंडिबा.

“ आणि अशा रीतीनें जर हें लोकसंख्या वाढण्याचें कार्य चालूच राहिलें तर धरणयोजना आणि मोठे उद्योगधंदे सुरू-

करूनहि देशाला सुखसमृद्धीचे दिवस यायला खूप वर्षं लागतील. लोकसंख्या खूप झाल्यानें काय काय झालं पाहा. मुलांची संख्या वाढली म्हणून विद्यार्थी वाढले, विद्यार्थी वाढले म्हणून शिक्षण महाग झालें. बरं विद्यार्थी शिकून तयार झाले तरी देशांत अजून उद्योगधंदे लोकवस्तीच्या मानानें कमी असल्यामुळें बेकारांची संख्या वाढली. उद्योगधंदे कांहीं ठराविक मोठ्याच शहरांत




असल्यामुळें सगळ्यांची धांव शहराकडे. सगळेच शहरांत आल्यामुळें राहण्याची जागेची अडचण उत्पन्न झाली, बेकारी वाढली, म्हणून चोऱ्यामाऱ्या वाढल्या. या साऱ्यांचें मूळ वाढती लोकसंख्या हेंच आहे. आणि म्हणूनच देशांतल्या उद्योगधंद्यांची चांगली प्रगति होईपर्यंत तरी आपल्या देशांत कुटुंबनियोजन हवंच."


"मास्तर, तुम्ही तर या इषयाचा लईच इचार केलेला दिसतुया. तुमचं म्हननं खरं हाय, यांत तर शंकाच नाय!" कोंडिबा म्हणाला.

"कोंडिबादादा, कुटुंबनियोजन जसं देशासाठीं करायचं, तसंच स्वतःच्या फायद्यासाठीं पण करायचं."

"त्ये फायदे तरी आमास्नी नीट सांगा मास्तर" – कोंडिबा.

"ऐका तर त्याचे फायदे. पहिला फायदा म्हणजे आपल्या बायकोचें आरोग्य चांगलें राहतें. जर तुम्ही कुटुंबनियोजन केलें नाहीं तर दर वर्षी तुमच्या घरांत पाळणा हलणार. त्यामुळें काय होणार? पहिल्या पोरांचे हाल होणार. बरं पोराच्या बाळंत-

पणांतून बाई जरा मोकळी होते आहे, तोंवरच दुसऱ्या खेपेची तयारी झाली कीं बिचाऱ्या त्या बाईच्या पण तब्येतीची दुर्दशा. विश्रांति तर तिला लाभतच नाहीं. मग परिणामीं तिलाहि रोग होतो आणि मुलांची आई असूनहि तिला मुलांची कांहीं देखभाल करतां येत नाहीं; तेव्हां



कुटुंबनियोजनामुळें मुलांच्या आईला लवकर बाळंतपणाचा होणारा त्रास चुकेल, दोन मुलांतलें अंतर चांगलें राहील आणि तिचीहि तब्येत सुधारेल. काय कोंडिबादादा, मी म्हणतोंय तें खरं आहे ना ? ”

“ आपन म्हनताय त्यें अक्षरशः खरं हाय मास्तर ! संमद्या घरामंदी वायामानसांची ह्योच तऱ्हा हाय ! अक्षी बाळतपन, अन् अक्षी काय ना काय बिमारी हाय बघा ! ” कोंडिबानें उत्तर दिलें.

“ दुसरा फायदा असा कीं आपल्या घरांतलीं माणसें बेताचींच असलीं म्हणजे आपल्या मिळकतींत सर्वांचे खाणेंपिणें, वस्त्र, शिक्षण, यांची सोय चांगल्या रीतीनें करतां येते. नाहींतर काय होतें ? मिळविणारा असतो एक आणि खाणारीं तोंडें असतात दहा. त्यामुळें सगळ्यांना पोटभर खायला घालतां येत नाहीं. रोगापायीं डॉक्टरकडे पैसा ओतावा लागतो. शिक्षण अर्धवट सोडून द्यावें लागतें आणि प्रसंगीं सावकाराकडून कर्ज काढून कर्जबाजारी व्हावें लागतें. म्हणून म्हणतों, कोंडिबादादा, आपल्या कुटुंबाच्या फायद्यासाठीं आणि देशाच्या भल्यासाठीं कुटुंबनियोजनाचा प्रचार व्हायलाच हवा ! ”

“ मास्तर, आपलं म्हननं आमास्नी पटलंया, पन् हीं साधनं का काय म्हनत्यात, तीं आमास्नी कुठं गवसनार ? ” कोंडिबा.




“ अहो, ह्याची माहिती देण्यासाठीं नगरपालिकेनें निरनिराळ्या हॉस्पिटलमधून खास केंद्रें उघडलीं आहेत. तेथें गेलें कीं सारी माहिती नीट समजावून सांगतात. कोंडिबादादा, देशासाठीं इतर कांहीं मोठा त्याग करतां आला नाहीं तरी येवढें कुटुंबनियोजनाच्या प्रचाराचें काम केलेंत तरी ती देशसेवाच आहे. त्यांत सर्वांचेंच कल्याण आहे. तेव्हां कोंडिबादादा, आजपासूनच करा सुरुवात. यासाठीं जयरामदादापासूनच सुरुवात करा. ”

“ वा, परचाराला कूळ बी बरं गवसलंय लगेच ! ”

“ बराय् मास्तर, येळ बी संपली तवां येतों आतां ! ” कोंडिबा.

“ बराय्, नमस्ते ! ”

★ ★ ★

# ६ : आपला ध्वज-घटना व राष्ट्रगीत

"काय जयरामदादा, पेढे बिढे आणलेत कीं नाहीं?"

"आनल्येत कीं, ह्ये घ्या अन् कोंडिबादादानं तुमच्या कुटुंबनियोजनाची माहिती पन् सांगितलीया!" जयरामदादानं उत्तर दिलं.

"वा, वा, कोंडिबादादा, तुम्ही अगदीं लगेच कामाला सुरुवात देखील केलीत म्हणायची!"

"अवो, मंग उशीर कशापायीं करायचा"—कोंडिबा.

"तेंहि बरोबरच आहे! बसा ना. हं, आतां आजचा विषय आणि आजची बातमी बघायची नाहीं का?"

"व्हय, त्यें तर ठरलेलंच हाय न्हवं का? त्येसाठींच तर आमी येतुंया." जयरामदादा म्हणाला.

"कोंडिबादादा, मीं जर तुम्हांला सांगितलं कीं आपल्या देशाचा झेंडा फाडून टाका, तर तुम्ही ऐकाल?"

"मास्तर, ह्यें काय वंगाळ बोलताया. अवो, काय बी झालं तरी त्यो आपल्या देशाचा झेंडा हाय! त्येस्नी मानच द्याया हवा"—कोंडिबा.

"शाबास, कोंडिबादादा. अहो, तुम्हां अशिक्षितांना जेवढें ज्ञान आहे तेव्हढें आपल्या देशांतल्या पुष्कळ शिकलेल्यांना सुद्धां नाहीं."

"म्हंजी, असला गाढवपना कोनी केलाय कीं काय?" जयरामदादा.

"मद्रासकडे कांहीं लोकांची एक चळवळ चालू आहे. त्यांचा कार्यक्रम हाच कीं, घटना पसंत नाहीं, टाका जाळून. राष्ट्रध्वजाला आग लावा. ब्राह्मणांचीं घरें जाळा. ब्राह्मणांना ठार करा!"

“अवो, पन् ह्यें कशापायीं चाललेंया ?” कोंडिबानं विचारलं.

“त्यांचं म्हणणं असं आहे कीं, विनोबाजी, जवाहरलाल नेहरू सगळे सगळे लोक ब्राह्मणच आहेत. आपल्या देशाची घटना ज्यांनीं तयार केली त्यांतहि ब्राह्मणच जास्त होते. म्हणून हें ब्राह्मणांचंच राज्य आहे, इतरांचं त्यामुळं अकल्याणच होणार !”



“मास्तर, विनोबाजी, जवाहरलाल ह्यांनाबी केवळ बामन म्हननारीं ह्यीं मानसं पहिल्यांदाच ऐकतुंया !”

“कोंडिबादादा, या लोकांना एव्हढें कळत नाहीं कीं जे जे महापुरुष असतात त्यांना कोणतीच जात नसते. त्यांचीं हृदयें खरोखर फार थोर असतात. त्यांना एकच एक ध्यास असतो कीं या देशांतल्या एकूण एक माणसाचं हित साधायचं ! हा ब्राह्मण, हा शूद्र, हा मोठा, हा छोटा असले भेद या महात्म्यांच्या मनाला शिवताहि नाहींत. शिवाय असं पाहा, कोंडिबादादा, मतभेद असला तरी राष्ट्रध्वज फाडायचा, घटना जाळायची, असला मूर्खपणा करणें केव्हांहि निषेधार्हच आहे.”




“मास्तर, आपलं म्हननं येकदम कबूल हाय !”

“जयरामदादा, राष्ट्रध्वजाचा अपमान म्हणजे साऱ्या देशाचाच अपमान करण्यासारखं आहे, कारण तो साऱ्या देशाचाच झेंडा असतो. तो अतिशय पवित्रच

मानला पाहिजे. देवाइतकीच ध्वजाची थोरवी मोठी आहे. कोंडिबादादा, ध्वजाचा मान कसा ठेवायचा याबद्दल कांहीं नियम आहेत."

"मंग आमास्नी तरी त्यें सांगा!" कोंडिबादादा.

"वा, माझ्या मनांतलीच गोष्ट बोललांत तुम्ही! मी पण आज तुम्हांला राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि आपली घटना याचीच माहिती देणार होतों."



"मंग, सांगाच मास्तर म्हंजे आमालाबी आमची चूक सुधारतां येईल"– जयरामदादा.

"जयरामदादा, आपल्या देशाच्या झेंड्याचा मान आपण नेहमीं राखलाच पाहिजे. आपला झेंडा किती रंगांचा आहे हें तुम्हांस माहीतच असेल."

"व्हय, तो तीन रंगांचा हाय न्हवं का?" कोंडिबा.

"बरोबर, आपल्या ध्वजावर तीन रंगांचे पट्टे आहेत. पहिला पट्टा केशरी रंगाचा, दुसरा सफेत म्हणजे पांढरा, तिसरा पट्टा हिरव्या रंगाचा. झेंड्याच्या आकाराच्या लांबी-रुंदीचें प्रमाण सुद्धां ठरलेलें असत बरं का! उगीच तीन रंगांचा कोणत्याहि आकाराचा झेंडा करणें चूक आहे."

"त्यें परमान तरी काय हाय?" जयरामदादानें विचारलें.

"साधारणतः झेंड्याचें प्रमाण दोनास तीन असें आहे."

"म्हंजी कसं?" कोंडिबा.


"म्हणजे झेंड्याची रुंदी दोन फूट असेल तर लांबी तीन फूट असणार. शिवाय आणखीन काय असतं आपल्या झेंड्यावर जयरामदादा?"

"येक गोल चक्र असतं, व्हय ना मास्तर?"

"बरोबर. आपल्या झेंड्यावर हें चक्र कां घेतलें माहीत आहे का?"

"त्ये गांधीबाबाच्या चरक्याची खून हाय न्हवं का?"

"कोंडिबादादा, पुष्कळांना असंच वाटतं. पण खरं तस नाहीं. आपल्या देशांत फार पूर्वीं अशोक नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें अतिशय चांगल्या रीतीनें राज्य करून सगळीकडे शांतता प्रस्थापित केली आणि म्हणूनच आपण अशोक-स्तंभावरील धर्मचक्राची खूण आपल्या झेंड्यावर स्थापन केली आहे. हें चक्र झेंड्यावर कुठं असतं कोंडिबादादा?"





"पांढऱ्या पट्ट्यावरच ना मास्तर?"

"बरोबर. या चाकाला एकंदर चोवीस आंस आहेत. आतां झेंडा उभारायचा कसा त्याचेंहि नियम सांगतों हं तुम्हांला!"

"सांगा कीं!" जयरामदादा बोलला.

"ज्या वेळीं ध्वज लावला जातो त्या वेळीं सर्वांनीं शांत-पणानें उभें राहिलें पाहिजे. ध्वजाचा केशरी रंगाचा पट्टाच नेहमीं



वरच्या बाजूस हवा. नाहींतर केव्हां केव्हां अज्ञानामुळें हिरव्या रंगाचा पट्टा वर येतो. असें केव्हांहि होतां कामा नये. राष्ट्रध्वज नेहमीं सर्वांत उंचच लावला पाहिजे. त्याच्यापेक्षां कोणतीहि वस्तु उंच असतां कामा नये. समजा, तुम्हांला एखाद्या कार्यक्रमाच्या वेळीं राष्ट्रध्वजाबरोबर आणखीन कांहीं झेंडे लावायचे आहेत, तर अशा वेळेला आपला राष्ट्रध्वज त्या सर्व झेंड्यांच्याहि वरच्या उंचीवरच हवा. मिरवणुकींत सुद्धां राष्ट्रध्वज पहिल्यांदा हवा. मिरवणुकींत झेंडा कसा धरावा याला सुद्धां नियम आहेत हो !"

"त्येस्नी नियम कशाला हवाय मास्तर? झेंडा डाव्या खांद्यावर घट्ट धरूनशान् चालत राह्यचं व्हय ना मास्तर?" कोंडिबानं विचारलं.

"बघा, कोंडिबादादा, जी गोष्ट तुम्हांला सोपी वाटली नेमकी तीच सांगायला चुकलांत तुम्ही. मिरवणुकींत झेंडा घेऊन जाणाऱ्या माणसानें झेंडा नेहमीं आपल्या उजव्या खांद्यावरच धरावयाचा असतो. झेंडा नेहमीं सरळ उभा धरावा. त्याला कधींहि आडवा धरूं नये. व्याख्यानाच्या वेळीं झेंडा वक्त्यांच्या मागच्या बाजूस लावायचा असतो. कांहीं लोक व्याख्यानाच्या वेळीं झेंडा टेबलावर पसरतात. पण असं करूं नये. इतकंच काय पण समारंभाच्या वेळीं, अगर दुकानाच्या सजावटीसाठीं सुद्धां

त्याचा उपयोग करावयाचा नसतो. ही झाली झेंड्याबद्दलची माहिती."

"मास्तर, आतां घटना म्हंजी काय?" कोंडिबानं विचारलें.

"कोंडिबादादा, प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला आपापली घटना असते. देशाचा राज्यकारभार कशा पद्धतीनं चालवायचा हें सगळें त्या घटनेंत लिहिलेलें असतें. त्याप्रमाणें देशाचा सगळा कारभार चालत असतो."

पन् ह्ये घटना कोन तयार करतुया?"

"अहो, आपला देश जेव्हां स्वतंत्र झाला ना, तेव्हां आपल्या देशाची घटना तयार करण्यासाठीं त्या वेळच्या सरकारनें एक घटना समिति नेमली. त्यामध्यें देशांतले विद्वान् लोक घेतले होते. त्याचप्रमाणें अस्पृश्यांचे थोर पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पण त्या समितींत होते. या सर्व लोकांनीं देशांतल्या परिस्थितीचा, चालीरीतींचा, धर्माचा, वगैरे सर्व गोष्टींचा नीट विचार करून, आपल्या देशाचा कारभार कसा असावा याचा नीट आराखडा तयार केला. मग लोकसभेनें तो पास केल्यावर या देशाच्या राज्यकारभाराची घटना तयार झाली. असा आहे या घटनेचा थोडक्यांत इतिहास. कोंडिबादादा, आतां आपली वेळ होत आली आहे. तरीपण आणखीन एका गोष्टीबद्दल माहिती देतों."



"ती कशाबद्दल?" जयरामदादा—

"ती माहिती आपल्या राष्ट्रगीताबद्दल. प्रत्येक देशाला आपापलें राष्ट्रगीत असतें. तसेंच आपल्या देशालाहि आहे. तुम्हांला ठाऊक आहे का आपलें राष्ट्रगीत कोणतें तें ?"

"नाय बा. आमास्नी कसं ठाऊक असनार ?"

आपल्या राष्ट्रगीताचें नांव आहे "जन-गण-मन अधिनायक" कोंडिबादादा, थांबा, तें मी तुम्हांला वाचूनच दाखवतों हं.—

जन-गण-मन-अधिनायक जय हे,
भारत-भाग्यविधाता.
पंजाब-सिंध-गुजरात-मराठा,
द्राविड-उत्कल-वंग
विंध्य-हिमाचल-यमुना-गंगा
उच्छल जलधितरंग.
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे.
गाहे तव जय-गाथा
जन-गण-मंगल-दायक जय हे
भारत-भाग्यविधाता.
जय हे, जय हे, जय हे
जय जय जय जय हे.

"कोंडिबादादा, हें राष्ट्रगीत लिहिलंय कोणी ठाऊक आहे का तुम्हांला ?"

"नायबा, तें बी आमास्नी ठावं नाय !" कोंडिबा.

"हें गीत आपल्या देशांत पूर्वी होऊन गेलेले महान् कवि रवींद्रनाथ टागोर यांनीं लिहिलें आहे. ज्या वेळेला राष्ट्रगीत चालू असतें ना त्या वेळेला सर्वांनीं न हलतां शांतपणानें उभे राहावयाचें

असतें. राष्ट्रगीत केव्हांहि एक मिनिटापेक्षां अधिक वेळ वाजवावयाचें अगर म्हणावयाचें नसतें. झेंडा चढवितांना अगर उतरवितांना हें गीत वाजवितात अगर म्हणतात. जयरामदादा, असा आहे आपल्या राष्ट्रगीताचा थोडक्यांत इतिहास. तेव्हां आतां सांगा पाहूं आज मी तुम्हांला कोणकोणत्या गोष्टींबद्दल माहिती दिली ती ?"



"मी सांगतुंया मास्तर," कोंडिबा पटकन् बोलला.

"हं. सांगा."



"येक आपला झेंडा, दुसरी आपली घटना, अन् तिसरं म्हंजे आपलं राष्ट्रगीत, बरावर हाय ना मास्तर ?"

"वा छान ! राहतील ना या तीन गोष्टी आतां तुमच्या ध्यानांत ?"

"हो हो, अवश्य !"

"कोंडिबादादा, जयरामदादा, आतां उद्यांपासून आपला हा कार्यक्रम एक महिनाभर बंद."

“ म्हंजी ? ” दोघांनीं एकदमच आश्चर्यानें विचारलें.

“ उद्यांपासून आमच्या शाळेला एक महिन्याची सुट्टी आहे. तेव्हां म्हटलं जरा गांवीं जावं आणि गांवकरी मंडळींना भेटून यावं. ”

“ असं हाय हो मास्तर ? पन् मास्तर तुमी जानार अन् आमाला मातुर जरा चुकल्यासारखं व्हनार. पन् तुमचं मी बराबर हाय ! गांवींबी जायाच होवं ! ” कोंडिबा.

“ तेव्हां कोंडिबादादा, मीं सांगितलेल्या गोष्टी नेहमीं लक्षांत ठेवा आणि आपल्या सोबती लोकांत त्यांचा नेहमीं प्रचार करीत चला. ”

“ त्येच्याबद्दल खात्री असूं द्या मास्तर ! ”

“ अच्छा नमस्ते, पुन्हां आपली भेट एक महिन्यानं ! ”

“ बराय् मास्तर, राम राम ! ”

“ जय हिंद ! ”

* * *

अनुक्रम
विभाग
क्रमांक २०९५
नों. दि.
IRBK-0107085